“प्रथम टप्प्यात राज्यातील पाच जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमध्ये व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र सुरु करणेबाबत... ”

**महाराष्ट्र शासन**

**रोजगार व स्वयंरोजगार विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः रोस्वरो-२०१२/प्र.क्र.३०९/रोस्वरो-१**

नवीन प्रशासन भवन, १४ वा मजला

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२

तारीख: १९/०५/२०१४

**प्रस्तावना —**

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमान्वये वाढत्या बेरोजगारीवर उपाययोजना म्हणून बदलत्या रोजगार क्षेत्रांच्या आवश्यकतेप्रमाणे युवकांना रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण देणे व रोजगार/स्वयंरोजगारक्षम बनविणे अभिप्रेत आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता राज्यस्तरावर राज्यातील कौशल्य विकास कार्यक्रमाची आखणी व राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मा.मुख्यमंत्र्यांचे अध्यक्षतेखाली शिखर परिषदेची तसेच, मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली राज्याची शिखर संस्था म्हणून महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था स्थापन केली आहे. या अनुषंगाने राज्याच्या कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२२ पर्यंत ४.५० कोटी उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगारानुरुप प्रशिक्षण देवून त्यांचा कौशल्य विकास करण्याचे लक्ष्य ठरविण्यात आले आहे. कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत सर्व रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांचे आधुनिकीकरण करुन तेथे व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करणे, या केंद्रांमार्फत उमेदवारांना रोजगारविषयक मूल्यवर्धित (Value Added Services) सेवा उपलब्ध करुन देवून खाजगी क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार रोजगारक्षम करणे व युवकांना अनुरुप रोजगार/स्वयंरोजगार प्राप्त करुन देणे हे समुपदेशन केंद्राचे उद्दिष्ट आहे. लोकलेखा समिती (२०१०-११) (बारावी महाराष्ट्र विधानसभा) यांच्या आठव्या अहवालातील रोजगार व स्वयंरोजगार विभागाशी संबंधित परिच्छेद क्रमांक ३.७८ अन्वयेसुध्दा याबाबत शिफारस करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत राज्यातील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत बेरोजगार उमेदवार व उद्योजकांकरीता विभागाच्या www.maharojgar.gov.in या वेबपोर्टलच्या सहाय्याने मुख्यतः खालील प्रकारच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात.

१)उमेदवारांची रोजगार/स्वयंरोजगाराकरीता नोंदणी, पात्रता वाढ करणे.

२)उद्योजकांकडील रिक्त पदांच्या अनुषंगाने पात्र उमेदवारांची यादी पुरविणे..

३) उमेदवारांच्या कौशल्य विकासासाठी रोजगार प्रोत्साहन योजना राबविणे.

४) उमेदवारांना स्पर्धा परिक्षा पूर्व तयारी करीता अभ्यासिका सुविधा उपलब्ध करणे.

५) उमेदवारांना रोजगार उपलब्ध व्हावा या दृष्टीने रोजगार मेळावे आयोजित करणे.

६)उद्योजक, प्रशिक्षण संस्था, सेवा पुरविणारे इ. ची नोंदणी करणे.

७) उमेदवारांना रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा या दृष्टीने सेवा सहकारी संस्था स्थापन करणे.

८) उमेदवारांना रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा या दृष्टीने रोजगार व स्वयंरोजगाराबाबत माहिती देणे इ.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेवून राज्यातील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमध्ये, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन क्षेत्रातील तज्ञ संस्थांच्या सहभागाने व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करणे ही बाब शासनाच्या विचाराधीन होती व त्यानुसार मंत्रीमंडळाच्या दि. २६.०२.२०१४ च्या बैठकीत दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

**शासन निर्णय-**

राज्याच्या कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२२ पर्यंत ४.५० कोटी बेरोजगार उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगारविषयक प्रशिक्षण देवून त्यांचा कौशल्य विकास करणे व रोजगार/ स्वयंरोजगारक्षम करण्याचे लक्ष्य आहे. या अनुषंगाने राज्यातील रोजगार व स्वयंरोजगार यंत्रणेमार्फत नोंदणी केलेल्या बेरोजगार उमेदवार व उद्योजक यांना सद्यःस्थितीत ज्या सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात, त्या व्यतिरिक्त अधिक मूल्यवर्धित सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी (मुल्यमापन चाचणी, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन/समुपदेशन, मुलाखतीची संधी) प्रथम टप्प्यात मुंबई-उपनगर, औरंगाबाद, नागपूर, सांगली व सिंधुदुर्ग येथील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमध्ये व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करण्याकरिता याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यात या निर्णयाद्वारे स्थापन करावयाच्या व्यवसाय व मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र या योजनेचा उद्देश, लक्ष्यगट द्यावयाच्या सेवा इ. खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दयांचे नाव | मुद्दयांबाबत सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १. | **योजनेचे नाव** | महाराष्ट्र राज्यात व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करणे. |
| २. | **योजनेचा उद्देश** | •उमेदवारांची मूल्यमापन चाचणी (वर्तणूक, मानसशास्त्रीय, कौशल्य, कल इ. चाचणी) घेणे, समुपदेशन करुन रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणेबाबत सहाय्य करणे.<br>• उमेदवारांचा नोंदणीपट वाढविणे.<br>• स्थानिक उद्योजकांशी संपर्क करुन उद्योजकांचा नोंदणीपट वाढविणे. तसेच, उद्योजकांच्या गरजेनुसार रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाच्या नोंदणी पटावर असलेल्या बेरोजगार अर्हताकारी उमेदवारांना रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे मनुष्यबळाचा पुरवठा करणे.<br>• उमेदवार व उद्योजकांना रोजगार सेवा अधिक चांगल्या व प्रभावीरित्या पुरविणे. |

| अ.क्र. | मुद्दयांचे नाव | मुद्दयांबाबत सविस्तर माहिती |
|---|---|---|
| | | • सद्यस्थितीतील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांचे नूतनीकरण करणे व त्यामध्ये व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करणे. |
| ३. | **लक्ष्यगट** | • रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, web portal येथे नाव नोंदणी केलेले १४ ते ४० वयोगटातील बेरोजगार उमेदवार.<br>• शैक्षणिक पात्रता-, १०वी/१२वी, आय.टी.आय, पदवीधारक, पदविकाधारक किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षित, शिक्षण सोडलेले, कुशल अथवा अकुशल उमेदवार.<br>• नोकरीचा अनुभव असलेले अथवा नसलेले बेरोजगार उमेदवार. |
| ४. | **प्रस्तावित केंद्राद्वारे उपलब्ध करुन देण्यात येणा-या सेवा** | या व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रांव्दारे उमेदवार व उद्योजकांकरीता खालील मूल्यवर्धित सेवा उपलब्ध करुन देण्यात येतील :-<br>• उमेदवार व उद्योजकांची नोंदणी करणे/नोंदणी वाढविणे.<br>• उमेदवारांची मूल्यमापन चाचणी (Assessment Test) - वर्तणूक चाचणी (Behavioural Test) मानसशास्त्रीय चाचणी (Psychological Test), कौशल्यचाचणी (Skill Test), कल चाचणी (Aptitude Test) घेणे.<br>• वरील प्रमाणे चाचणीवर आधारीत आवश्यक त्या प्रशिक्षणाबाबत उमेदवारांना मार्गदर्शन /शिफारसी करणे. उमेदवारांना रोजगाराकरीता मार्गदर्शन व समुपदेशन करुन मुलाखतीची संधी उपलब्ध करुन देवून रोजगार उपलब्ध करुन देणे. उमेदवारांना स्वयंरोजगाराबाबत मार्गदर्शन करुन त्याकरीता प्रोत्साहीत करणे व स्वयंरोजगार उपलब्ध होईल या दृष्टीने सहाय्य करणे. |
| ५. | **व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रामध्ये उपलब्ध करुन देण्यात येणा-या पायाभूत सुविधा** | व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रामध्ये रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयामार्फत खालीलप्रमाणे पायाभूत सूविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.<br>• उमेदवारांसाठी - नोंदणी, रोजगार क्षमता चाचणी, समुपदेशन, ग्रंथालय, कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण इत्यादि करीता स्वतंत्र व सुसज्ज कक्ष.<br>• उद्योजकांसाठी - बैठक कक्ष, मुलाखत कक्ष इत्यादि करीता स्वतंत्र सुसज्ज कक्ष.<br>• इतर सुविधा - केंद्र प्रमुखासाठी कक्ष, स्वच्छता गृह, जागेच्या उपलब्धतेनुसार पॅन्ट्री, स्टाफरुम इ. वरील प्रमाणे पायाभूत सूविधा रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयामार्फत उपलब्ध करुन देण्यात येतील.<br>आवश्यक पायाभुत सुविधांचा मार्गदर्शक तपशिल परिशिष्ट१- मध्ये दर्शविला आहे. या केंद्रातील दैनंदिन कार्यालयीन बाबींवरील खर्च हा रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयामार्फत करण्यात येईल. |

| अ.क्र. | मुद्दयांचे नाव | मुद्दयांबाबत सविस्तर माहिती |
|---|---|---|
| ६. | **केंद्राचे व्यवस्थापन करण्या-या बाहय संस्थाची नेमणूक व त्यांनी पार पाडावयाच्या जबाबदा-या** | उपरोक्त मुल्यवर्धीत सेवा उपलब्ध करुन देण्याकरीता व्यावसायिक तज्ञ मनुष्यबळ तसेच आधुनिक तंत्रज्ञानाची आवश्यकता विचारात घेऊन अशा प्रकारच्या सेवा देणा-या व्यावसायिक बाहय संस्थेचे सहकार्य घेण्यासाठी अशा संस्थाची निवड विहीत पध्दतीने करण्यात येईल .<br>या संस्थांमार्फत केंद्राच्या व्यवस्थापना अंतर्गत प्रामुख्याने खालील प्रकारची कामे करण्यात येतील.<br>• उमेदवारांची मूल्यमापन चाचणी घेणे.<br>• मूल्यमापन चाचणीसाठी आवश्यक संबंधित अद्ययावत आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करुन देणे.<br>• मूल्यमापन चाचणी संबंधित आवश्यक सर्व ( ओएमआर शिट्स सह) स्टेशनरी उपलब्ध करुन देणे.<br>• मूल्यमापन-चाचणीच्या निष्कर्षाच्या अनुषंगाने उमेदवारांस त्याच्या करिअरच्या दृष्टीने काळानुरुप आवश्यक असलेले कौशल्य वाढीसाठी एमईएस अंतर्गत/ समकक्ष/ रोजगाराभिमुख प्रशिक्षण घेण्याकरिता उमेदवारास प्रशिक्षण व प्रशिक्षण देणारी संस्था याबाबत मार्गदर्शन करणे व उमेदवारांस रोजगार मिळून देण्यासाठी पूरक असे, जे प्रशिक्षण व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रामध्येच उपलब्ध करुन देणे शक्य आहे, ते उमेदवारांच्या सहमतीने प्रशिक्षण शुल्क आकारुन उपलब्ध करुन देणे. उदा. संगणकाचे प्राथमिक ज्ञान, सॉप-ट स्किल्स, उद्योजकता विकास प्रशिक्षण, मुलाखतीची पूर्व तयारी (संभाषण क्षमतेसह), व्यक्तीमत्व विकास इ.<br>• केंद्राच्या व्यवस्थापनाकरीता आवश्यक तज्ञ मनुष्यबळासह सर्व मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे उदा- केंद्र प्रमुख, रोजगार क्षमता मूल्यमापक, समुपदेशक, रिसेप्शनिस्ट तथा मार्गदर्शक, सफाईगार इ.<br>• उद्योजकांकडील रिक्त पदांचा शोध घेणे, रिक्त पदे संकलित करणे, रिक्तपदे केंद्रामार्फत प्रसारीत करणे.<br>• उमेदवारांची योग्य पदांकरीता शिफारस करणे,<br>• उमेदवारांच्या खाजगी उद्योजकांसमवेत मुलाखती आयोजित करणे,<br>• उमेदवारांस राज्यात, राज्याबाहेर रोजगार उपलब्ध करुन देणे<br>• उमेदवारांना स्वयंरोजगार सुरु करण्यास मार्गदर्शन व सहकार्य करणे.<br>• उमेदवार, उद्योजक व प्रशिक्षण संस्था इ. जास्तीत जास्त प्रमाणात रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या वेबपोर्टलवर नोंदणी करतील अशा प्रकारची आवश्यक ती सर्व कार्यवाही करतील. |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>मुद्दयांचे नाव</th><th>मुद्दयांबाबत सविस्तर माहिती</th></tr>
<tr><td></td><td></td><td>
<ul>
<li>केंद्र उभारणीसाठी तसेच केंद्राच्या कामकाजाचा आढावा घेवून केंद्र जास्तीत जास्त प्रभावीरित्या कार्यरत राहण्याकरिता वेळोवेळी आवश्यक सूचना व सल्ला देणे.</li>
<li>केंद्राच्या कामकाजाविषयक आदर्श कार्यपध्दती ( स्टॅन्डर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर- एस.ओ.पी. ) तयार करण्याकरिता/ सुधारणा करण्याच्या दृष्टीने आवश्यकतेप्रमाणे सहकार्य करणे.</li>
<li>योजनेचा प्रचार, प्रसार, प्रसिध्दीचे नियोजन व संबंधित कामकाज करण्यास आवश्यक सहकार्य करणे.</li>
<li>योजनेचा/ केंद्रांतील सेवांचा विस्तार करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य करणे.</li>
<li>योजना राबवितांना योजनेवर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी व वेळोवेळी आढावा घेण्यासाठी रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या वेबपोर्टलवर नोंदणीकृत असलेले उमेदवार, उद्योजक, प्रशिक्षण संस्थांबाबतची अद्ययावत माहिती वेळोवेळी रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या वेबपोर्टलवर उपलब्ध होईल अशा प्रकारची कार्यवाही करणे. उदा. वेबपोर्टलवर नोंदणी झालेले उमेदवार/ उद्योजक/ प्रशिक्षण संस्था, मूल्यमापन चाचणी झालेले उमेदवार, प्रशिक्षण घेत असलेले व प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार, रोजगार/ स्वयंरोजगार प्राप्त झालेले उमेदवार, संस्थेस अदा केलेली/ करावयाची रक्कम व इतर आवश्यक सांख्यिकी माहिती इ.</li>
<li>केंद्राव्दारे करण्यात आलेल्या कामकाजाचा अहवाल विहित नमुन्यात वेळोवेळी आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय व शासनास सादर करणे.</li>
</ul>
</td></tr>
<tr><td>७.</td><td>केद्रांचे व्यवस्थापन करणा-या बाहय संस्थाना देण्यात येणारे लक्ष्य</td><td>
प्रथम टप्प्यातील मुंबई-उपनगर, औरंगाबाद, नागपूर, सांगली व सिंधुदूर्ग जिल्हयांकरीता प्रतिवर्षी किमान २१,३५० इतक्या उमेदवारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे लक्ष्य निर्धारीत करण्यात येत आहे. आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास हे सदर लक्ष्यपूर्तीचा वेळोवेळी आढावा घेवून आवश्यकतेनुसार जिल्हानिहाय लक्ष्य कमी अथवा जास्त करु शकतील.
<table>
<tr><th>अ.क्र</th><th>व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्राचे नांव</th><th>रोजगार उपलब्ध करुन देण्याचे लक्ष्य</th></tr>
<tr><td>१</td><td>मुंबई उपनगर</td><td>६,३००</td></tr>
<tr><td>२</td><td>औरंगाबाद</td><td>३,०००</td></tr>
<tr><td>३</td><td>नागपूर</td><td>६,५००</td></tr>
<tr><td>४</td><td>सांगली</td><td>४,१५०</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| अ.क्र. | मुद्दयांचे नाव | मुद्दयांबाबत सविस्तर माहिती |
|---|---|---|
| | | ५ \| सिंधुदूर्ग \| १,४०० <br> **एकूण** \| **२१,३५०** |
| ८. | **केंद्राचे व्यवस्थापन करणा-या बाहय संस्थाना देण्यात येणारे शुल्क** | उमेदवारांची मूल्यमापन चाचणी व समुपदेशन या दोन्ही सेवा निवड झालेल्या संस्थांव्दारा विनामूल्य देण्यात येतील. तथापि संस्थाना व्यवस्थापन शुल्क ( ज्यामध्ये केंद्रातील तज्ञ मनुष्यबळाचे मानधनाचा प्रामुख्याने समावेश आहे. सदर मानधन संस्थेमार्फत संबंधितांना परस्पर अदा करणेत येईल ) डिमांड जनरेशन शुल्क (उद्योजकांशी संपर्क करुन रिक्त पदे संकलित करणे) अदा करण्यात येईल. याव्यतिरिक्त उमेदवारांस रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध करुन दिल्यास प्रती उमेदवार नेमणूक शुल्क अदा करण्यात येईल. सदर व्यवस्थापन शुल्क, डिमांड जनरेशन शुल्क व नेमणूक शुल्क निविदा प्रक्रियेद्वारे निश्चित केलेल्या दर तसेच अटी व शर्तीप्रमाणे रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाद्वारे अदा केले जाईल. |
| ९. | **योजनेसाठी राज्यस्तरीय नोडल एजन्सी** | वरील योजना राज्य कौशल्य विकास कार्यक्रमाशी संबंधित असल्याने या योजनेसाठी महाराष्ट्र शासनाची महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था (मराकौवि संस्था) ही खालील कामासाठी नोडल एजन्सी म्हणून कामकाज पाहील. <br> • महाराष्ट्र राज्यात व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र सुरु करणे या योजनेकरिता सल्लागाराची भूमिका पार पाडणे. <br> • केंद्रांच्या कामकाजामध्ये एकसुत्रता व एकसमानता येण्याकरिता सद्यस्थितीत केंद्रांना भेटी देवून उपलब्ध स्त्रोतचा ( रिसोर्सचा) आढावा घेवून केंद्रासाठी आवश्यक नुतनीकरण/ अद्यायवतीकरण करणेबाबत सल्ला देणे. <br> • सद्यस्थितीत उपलब्ध पायाभूत सुविधा, संगणक यंत्रणा, फॅक्स, झेरॉक्स, स्कॅनर इत्यादी बाबींचा आढावा घेवून केंद्रासाठी आवश्यक अतिरिक्त उपकरणे तसेच नवीन बाबींसाठी टेक्निकल स्पेसिफिकेशन, दर्जा व केंद्रनिहाय संख्या निश्चित करणेबाबत रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयास सल्ला देणे व संचालनालयाकडून आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन घेणे. <br> • केंद्रासाठी आवश्यक मनुष्यबळाच्या क्षमतावाढीसाठी संबंधित पुरक प्रशिक्षण सुचविणे. <br> • उमेदवारास रोजगार/ स्वयंरोजगारक्षम होण्यासाठी पुरक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम निश्चित करणे तसेच वेळोवेळी काळानुरुप आवश्यक बदल सुचविणे.उदा. संगणकाचे प्राथमिक/ वाढीव ज्ञान, सॉफ्-ट स्किल्ल्स, |

| अ.क्र. | मुद्दयांचे नाव | मुद्दयांबाबत सविस्तर माहिती |
|---|---|---|
| | | उद्योजकता विकास प्रशिक्षण, मुलाखतीची पूर्वी तयारी, संभाषण कौशल्य, व्यक्तीमत्व विकास इ.<br>• केंद्राचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी आवश्यक डॉक्युमेंटस विकसित करुन उपलब्ध करुन देणे उदा. केंद्रनिहाय मुनष्यबळ (किमान आवश्यक शैक्षणिक पात्रतेसह), पायाभूत सुविधा, विविध उपकरणांची यादी , आदर्श कार्यपध्दती, उपकरणांच्या देखभालीचे वेळापत्रक, केंद्रासाठी आवश्यक मुनष्यबळाच्या प्रशिक्षणासाठी अभ्यासक्रम निश्चित करुन कोर्स मटेरीयल विकसित करणे, इ.तयार करणे.<br>• खालील प्रकारच्या संस्था/संस्थाची निवड करण्याकरिता आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांना शिफारस करणे, संस्थाच्या कामाचे निकष ठरणे, संस्थेच्या कामाची व्याप्ती, पेमेंट टर्मस् तसेच इतर अटी व शर्ती निश्चित करणे,निविदा तयार करणे, निविदा जाहिरातीचा मुसदा तयार करणे व तो प्रसिध्दीसाठी रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयानास सादर करणे.<br>१.केंद्राचे व्यवस्थापन करणारी संस्था.<br>२.मूल्यमापन चाचणी व समुपदेशन करणा-या संस्था इम्पॅनलमेंट.<br>३.प्रचार, प्रसार व प्रसिध्दी संबंधित नियोजन व कामकाज करणारी संस्था.<br>• संस्था निश्चित झाल्यानंतर निर्गमित करावयाचे लेटर ऑफ इंटेन्ट (एल.ओ.आय.) कार्यादेश (वर्क ऑर्डर), आवश्यकतेप्रमाणे मेमोरॅन्डम ऑफ अंडरस्टॅंडिग (एम.ओ.यु.) सर्व्हिस लेव्हल ॲग्रिमेंट ( एस.एल.ए.) तयार करणे<br>• सदर योजनेच्या पारदर्शक, प्रभावी व फलद्रुप अंमलबजावणीसाठी योजनेसंबंधित स्टेक होल्डर्सची कर्तव्ये आणि जबाबदारी निश्चित करणे व त्याप्रमाणे रिसपॉन्सिबिलिटी मॅट्रिक्स तयार करणे.<br>• योजनेच्या कामकाजाचे योग्य नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व आढावा याबाबतची कृती योजना निश्चित करणे.<br>• केंद्रे कार्यान्वित झाल्यानंतर कामकाजाचा आढावा घेवून केंद्र जास्तीत जास्त प्रभावीरित्या कार्यरत राहण्याकरिता वेळोवेळी आवश्यक सूचना व सल्ला देणे.<br>• योजनेचा/ केंद्राच्या सेवांचा विस्तार करणे, योजनेचा प्रचार, प्रसार, प्रसिध्दी, प्रसिध्दीचे नियोजन, प्रसिध्दी साहित्य (वर्तमानपत्र जाहिरात,लिफलेट, जिंगल्स , दूरचित्र वाहिनी, आकाशवाणी , ऑडियो-व्हिडीयो, सीडी, प-लेक्स बोर्ड, इ.) विकसित करणे व संबंधित कामकाजाबाबत आवश्यक मार्गदर्शन/ सल्ला देणे व सहकार्य करणे. |

| अ.क्र. | मुद्दयांचे नाव | मुद्दयांबाबत सविस्तर माहिती |
|---|---|---|
| | | वर दर्शविलेली कामाकाजाची यादी ही निर्देशक असून आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांना संस्थेच्या सदर कामकाजात वेळोवेळी बदल, वाढ अथवा कमी करण्याचे अधिकार राहतील. वरील कामकाज करतांना नोडल एजन्सी ( महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था) ही आयुक्त, रोजगार , स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांचेशी वेळोवेळी चर्चा/ सल्लामसलत करेल. तसेच, वरील बाबत निर्णय घेण्याचे अंतिम अधिकार आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांना राहतील. |
| १०. | **योजनेचा आढावा** | योजनेच्या फलनिष्पत्तीचा आढावा घेणे, त्यात कार्यात्मक व गुणात्मक सुधारणा सुचविणे याकरीता योजनेचे कन्करंट इव्हॅल्युएशन (मूल्यांकन) नियमित कालावधीत यशदा, पुणे संस्थेमार्फत करण्यात येईल व असा अहवाल यशदा शासनास सादर करेल. |
| ११. | **योजनेची अंमलबजावणी, पर्यवेक्षण व संनियंत्रण** | जिल्हयाचे सहायक संचालक या योजनेची अंमलबजावणी करतील. आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास हे आवश्यकतेप्रमाणे निधी संबंधित जिल्हयाच्या सहायक संचालक यांना उपलब्ध करुन देतील व सदर निधीकरिता संबंधित जिल्हयाचे सहायक संचालक आहरण व संवितरण अधिकारी राहतील. आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास हे या योजनेचा वेळोवेळी आढावा घेतील व योजनेचे संनियंत्रण करतील .योजनेच्या अंमलबजावणीकरिता निवड करण्यात येणा-या विविध संस्था/ संस्थांशी सामंजस्य करार (MOU) करण्याचे अधिकार आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांना राहतील. |
| १२. | **योजनेसंदर्भात रोजगार व स्वयंरोजगार संचालनालया-मार्फत करण्यात येणारी कार्यवाही** | **१.** केंद्राच्या पायाभूत सुविधा (स्थापत्य, इंटेरिअर, फर्निचर, विद्युत, संगणक लॅन इ.) निर्माण करण्यासाठी संस्था/ कंत्राटदाराची निवड करणे,<br>**२.** प्रचार, प्रसार व प्रसिध्दी संबंधित नियोजन व कामकाज करणारी संस्था निवडणे,<br>**३.** उपकरणे व आवश्यक त्या यंत्रणा खरेदीची प्रक्रिया करुन संस्था/ पुरवठादार निवड करणे.<br>**४.** वरील बाबतचे निकष निश्चित करणे, निवडीची विहीत पध्दतीने कार्यवाही करुन संस्थेची/ संस्थांची आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांना शिफारस करणे इत्यादी अनुषंगिक कामकाज करणे.<br>**५.** वरील प्रमाणे संस्था/पुरवठादार/कंत्राटदार यांच्या निवडीचे निकष निश्चिती, संस्थेची निवड, संस्थेच्या कामाची व्याप्ती, अटी व शर्ती निश्चित करणे आयुक्त, रोजगार,स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांच्या मान्यतेने |

| अ.क्र. | मुद्दयांचे नाव | मुद्दयांबाबत सविस्तर माहिती |
|---|---|---|
| | | संबंधित संस्था विषयीचे कार्यादेश निर्गमित करणे, देयके अदा करणे व इतर संबंधित सर्व कामकाज .<br>६. वर दिलेल्या कामकाजाची यादी ही निर्देशित असुन आयुक्त, रोजगार,स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांना संस्थेच्या सदर कामकाजात वेळोवळी बदल, वाढ अथवा कमी करण्याचे अधिकार राहतील. |
| १३. | **प्रकल्प व्यवस्थापन समिती** | सदर योजनेच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी खालील सदस्यांचा समावेश असलेली समिती आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास हे स्थापन करतील.<br>• प्रधान सचिव, रोजगार व स्वयंरोजगार विभाग- अध्यक्ष<br>• आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास- उपाध्यक्ष<br>• सह सचिव/ उपसचिव (रोस्वरो-१), रोजगार व स्वयंरोजगार विभाग- सदस्य<br>• संबंधित उपसंचालक ( विभागीय मुख्यालय), रोस्वरो- सदस्य<br>• निवड होणा-या संस्थेंचे प्रतिनिधी- सदस्य<br>• उद्योजक (किमान एक)- निमंत्रित सदस्य<br>• उप संचालक ( संचालनालय ) रोस्वरो-सदस्य सचिव<br><u>समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहिल.</u><br>• व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्राच्या फलनिष्पत्ती बाबतचा आढावा वेळोवेळी घेणे व अपेक्षित उद्देश साध्य होत नसल्यास त्यावर उपाययोजना सुचविणे.<br>• सदर योजना राबवितांना येणा-या अडचणीचे निराकरण करुन योजना यशस्वी होईल असे मार्गदर्शन करणे.<br>• उद्योजकांशी विचार विनिमय करुन काळानुरुप कोणत्या मनुष्यबळाची आवश्यकता आहे याचा वेळोवेळी आढावा घेणे.<br>• काळानुरुप नवीन अभ्यासक्रमाचा प्रशिक्षणाच्या योजनेत समावेश करण्याबाबत शिफारस करणे.<br>• कंकरंट इव्हॅल्युएशन अहवाल तथा समितीने योजनेचा वेळोवेळी घेतलेला आढावा विचारात घेवून योजनेच्या स्वरुपात आवश्यक ते फेरबदल करण्यास सूचना व मार्गदर्शन करणे.<br>• योजनेचा विस्तार करणेबाबत धोरण ठरविणे.<br>• समितीने सुचविलेल्या सुधारणांसह फलश्रुतीचा अहवाल वेळोवेळी संचालनालयास सादर करणे. |

| अ.क्र. | मुद्दयांचे नाव | मुद्दयांबाबत सविस्तर माहिती |
|---|---|---|
| | | • योजनेसाठीच्या पुढील दरवर्षीच्या आवश्यक अनावर्ती व आवर्ती निधीचा प्रस्ताव संचालनालयास सादर करणे. |
| १४. | **योजनेची पुढील कृती** | वरील समिती, योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु झाल्यापासून एक वर्षानंतर आपल्या शिफारशींसह फलश्रुतीचा अहवाल शासनास सादर करेल. सदर अहवालाच्या आधारावर शासन, योजनेच्या पुढील टप्प्यांबाबतचा प्रस्ताव मंजूरीस्तव मंत्रीमंडळ समोर सादर करील. |
| १५. | **योजनेच्या आर्थिक बाबी** | सदर योजनेसाठी उपलेखाशीर्ष प्राप्त झाल्यानंतर सन २०१४-१५ या वर्षात या योजनेसाठी निधी वितरीत करण्यात येईल. |

हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ अनुक्रमे क्रमांक १२०/१४७१ दि.१३.०३.२०१४ व क्रमांक ५१/व्यय-५ दि.२७.०१.२०१४ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०५२३१६१५५७४७०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Kumar

Digitally signed by Sanjay Kumar
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher And Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sanjay Kumar
Date: 2014.05.23 16:20:23 +05'30'

**संजय कुमार**

प्रधान सचिव , महाराष्ट्र शासन

सोबत- परिशिष्ट-१

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. सर्व विधानमंडळ सदस्य
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
७. आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, कोकणभवन, नवी मुंबई
८. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था, मुंबई
९. यशदा, पुणे
१०. निवडनस्ती (रोस्वरो-१)

परिशिष्ट-१

आवश्यक पायाभुत सुविधांचा मार्गदर्शक तपशिल

| अ.क्र. | पायाभूत सुविधांचा तपशिल | स्टँडर्ड साईज फूट | क्षेत्रफळ चौ.फूट | उपयोगिता |
|---|---|---|---|---|
| १ | स्वागत तथा नोंदणी कक्ष | २५ x १० | २५० | उमेदवार व उद्योजकांचे स्वागत तथा प्राथमिक मार्गदर्शन |
| २ | मूल्यमापन चाचणी कक्ष (ऑफलाईन) | १२ x १० | १२० | उमेदवारांची रोजगार क्षमता चाचणी |
| ३ | मूल्यमापन चाचणी कक्ष (ऑनलाईन) | १२ x १० | १२० | |
| ४ | समुपदेशन कक्ष | ७ x ६ | ४२ | समुपदेशन |
| ५ | प्रशिक्षण कक्ष | २० x १५ | ३०० | कौशल्य विकास प्रशिक्षण |
| ६ | संगणक प्रशिक्षण कक्ष | २५ x १४ | ३५० | |
| ७ | मुलाखत कक्ष | ८ x ८ | ६४ | उद्योजकांकरीता मुलाखत कक्ष |
| ८ | ग्रंथालय | २० x १५ | ३०० | उमेदवारांकरीता वाचनालय |
| ९ | केंद्र प्रमुख दालन | १० x १० | १०० | केंद्र प्रमुख दालन |
| १० | स्टाफ रुम | १० x १२ | १२० | केंद्रातील कर्मचा-यांकरीताचे दालन |
| ११ | बॅक ऑफिस | ५ x १० | ५० | फॅक्स, झेरॉक्स, ओएमआर मशिन (आवक/जावक) करीता |
| १२ | युपीएस/ईनव्हर्टर कक्ष | १० x ५ | ५० | युपीएस/ईनव्हर्टर ठेवण्याकरीता |
| १३ | स्वच्छता गृह | ५ x १० | ५० | पुरुष व स्त्रियांकरिता स्वतंत्र |
| १४* | पॅन्ट्री | १० x ५ | ५० | पॅन्ट्री |
| १५* | बैठक कक्ष | १२ x १४ | १६८ | उद्योजकांकरीता बैठक कक्ष |
| | एकूण | | २१३४ | |

टीप : वर दर्शविलेल्या पायाभूत सुविधांची यादी निर्देशक असून केंद्रातील उपलब्ध जागेनुसार प्राथम्यानुसार कमी/ अधिक मापाच्या कक्षाची उभारणी करण्यात यावी. वरीलपैकी काही कक्ष/ सुविधा सद्य:स्थितीत उपलब्ध असल्यास पुन्हा सदर कक्ष/ सुविधा उभारण्याची आवश्यकता नाही. तसेच पॅन्ट्री व बैठक कक्ष हा जागेच्या व आर्थिक तरतूद उपलब्ध असल्यास उपलब्ध करुन देण्यात येईल.